# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
## करआकारणी व करसंकलन विभाग

| | |
|---|---|
| : | **करसंकलन विभागामार्फत देण्यात येणाऱ्या विविध कर सवलतींबाबत...** |
| आदेश क्रमांक | कर/मुख्य/९/कावि/१५८/२०२२, दिनांक ०१ / ०६ /२०२२ |
| विषय : | मालमत्ताधारकांना सामान्य करात सवलत देण्याबाबत |
| कार्यवाहीसाठी | मालमत्ता कर आकारणी, तसेच वसूली करणारे सर्व अधिकारी / कर्मचारी |
| संदर्भ | १.महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम,कलम १२७, १२९ व १४०<br>२.परिपत्रक क्र. कर/मुख्य/६/कावि/१२७४/१३दिनांक ३०/३/२०१३(महिला सवलत)<br>३.कर व करेत्तर बाबींचे दरपत्रक सन २०२२-२०२३(ऑनलाईन पेमेंट गेटवे)<br>४.परिपत्रक क्र. कर/मुख्य/९/कावि/३२५/२१दि.८/१०/२०२१(माझीमिळकतमाझी आकारणी)<br>५.परिपत्रक क्र. कर/मुख्य/९/कावि/०१/२२ दि.१५/२/२०२२(कंपोस्टींग यंत्रणा सवलत)<br>६.परिपत्रक क्र. कर/मुख्य/६/कावि/४७०/११ दि.३/८/२०११(आगाऊ रक्कम भरणा सवलत)<br>७.मा.महापालिका ठराव क्रमांक ७६२ दिनांक २०/०१/२०२२<br>८.मा.प्रशासक यांचेकडील मा.महापालिका ठराव क्रमांक ५१ दि.१०/०५/२०२२ |

**आदेश,**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका शहरातील इमारती व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १२७ व १२९ नुसार कर आकारणी करणेत येत आहे. तसेच कलम १४० नुसार मालमत्ताकरामध्ये सूट / सवलत देणेबाबत तरतूद आहे. त्यानुसार मालमत्ताधारकांनी विहित वेळेत कराचा भरणा करावा यासाठी विविध प्रोत्साहनपर करसवलती महापालिकेमार्फत दिलेल्या आहेत.

करदात्या मालमत्ताधारकांना समन्यायी करसवलत देणे, सर्व घटकांना समावून घेणे, पुर्वीच्या करसवलतीमधील क्लिष्टता दूर करुन, सहज सोप्या स्वरुपात नव्याने करसवलती देऊन, करसवलत आदेशामध्ये समानता व सुलभता येण्याचे दृष्टीने सर्वच करसवलतींचा एकत्रितरित्या आढावा घेणेत येऊन, संदर्भ क्रमांक ८ चे ठरावाचे अनुषंगाने "महिला, ऑनलाईन पेमेंट, माझी मिळकत माझी आकारणी, कंपोस्टींग यंत्रणा, आगाऊ रक्कम भरणा" या संदर्भिय २ ते ६ सवलत योजना संबंधित आदेश / परिपत्रके या आदेशान्वये अधिक्रमित करणेत येऊन, (उर्वरित सर्व करसवलत योजना जैसे-थे ठेऊन) नवीन संकल्पना, सर्वसमावेशक धोरण व सुधारित करसवलत दरासह <u>**सोबतचे परिशिष्टामध्ये**</u> नमूद केलेल्या सुधारित करसवलत योजनांची अंमलबजावणी करणेस या आदेशान्वये मान्यता देणेत येत आहे.

प्रस्तुत करसवलत योजनेची अंमलबजावणी सन २०२२-२०२३ या आर्थिक वर्षापासून करण्यात येत असून, यामधील निकष अथवा अटी शर्ती मध्ये बदल अथवा रद्द करणेचे अधिकार राखून ठेवणेत येत आहे.

मा.आयुक्त यांचे मान्यतेने

(नीलेश देशमुख)
**सहाय्यक आयुक्त (करसंकलन)**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

सोबत – सुधारित करसवलत योजना परिशिष्ट

प्रति – सर्व विभाग प्रत – Tech 9 services

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८.
कर आकारणी व करसंकलन विभाग
परिपत्रक क्र.कर/मुख्य/९/कावि/१५४/२०२२ दि.०७/०६/२०२२ चे लगत
सुधारित कर सवलत योजना परिशिष्ठ

| क्र | लाभधारक | सुधारित सवलत योजना | आर्थिक वर्षाचे चालू मागणीतील सवलत | भरणा कालावधी (मुदत) | निकष |
|---|---|---|---|---|---|
| १ | महिला | फक्त महिलांचे नावे असलेल्या फक्त एका निवासी मालमत्तेस | देय सामान्यकर रकमेत<br>१) सन २०२२-२३ करिता ५०%<br>२) सन २०२३-२४ करिता ३०%<br>३) सन २०२४-२५ पासूनपुढे २०% | माहे एप्रिल ते जून अखेर (प्रत्येक वर्षी) | १) फक्त महिलेच्या नावे असलेल्या फक्त एका निवासी मालमत्तेस सवलत योजना लागू राहिल. एका पेक्षा अधिक मालमत्तेस लाभ घेत असलेचे निदर्शनास आलेस देण्यात आलेली सवलत रद्द करुन, सवलत रक्कम वसूल केली जाईल.<br>२) महानगरपालिका कार्यक्षेत्रामध्ये अन्य ठिकाणी सदर सवलत घेत नसलेबाबत साध्या कागदावर प्रतिज्ञापत्र सादर करावे लागेल.<br>३) सवलतीचा लाभ घेणेकामी थकबाकीसह सवलत रक्कम वगळता उर्वरीत संपूर्ण रक्कम एकरकमी भरणा करणे अनिवार्य राहिल. |
| २ | ऑनलाईन पेमेंट | थकबाकीसह एक रक्कमी मिळकत कराचा भरणा ऑनलाईन पेमेंट गेट-वेद्वारे करणारे मालमत्ताधारक | देय सामान्यकर रकमेत - ५% | माहे एप्रिल ते जून अखेर (प्रत्येक वर्षी) | १) On line पध्दतीने मालमत्ता कर भरणाऱ्या मालमत्ताधारकास सवलतीचा लाभ देय राहिल.<br>२) ४८ तासामध्ये एक किंवा त्यापेक्षा जास्त वेळा मालमत्ता कराचा भरणा केल्यास सदर सवलतीचा लाभ देय राहिल. (एकाच मालमत्तेच्या बाबतीत) |
| ३ | स्वयंस्फुर्तीने मालमत्ता नोंद Eassy Online Self Assessment | "माझी मिळकत, माझी आकारणी" योजनेअंतर्गत स्वयंस्फुर्तीने मालमत्तेची महापालिकेच्या संकेतस्थळावर अथवा स्वत: अर्ज करुन मालमत्ताकर आकारणी नोंदणी करणाऱ्या मालमत्ताधारकांस | देय सामान्यकर रकमेत - ५% | निरंतर | १) महानगरपालिका संकेतस्थळावरुन On line पध्दतीने मालमत्ता नोंद व आकारणी करणाऱ्या मालमत्ताधारकास सवलत योजना लागू राहिल.<br>२) सदर सवलत आकारणी झाल्यानंतर येणाऱ्या प्रथम बिलातील चालू मागणीतील सामान्य करावर सवलत देय राहिल.<br>३) चूकीची माहिती सादर करुन चूकीची आकारणी केल्याचे निदर्शनास आल्यास दिलेल्या सवलतीची रक्कम वसूल |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | करणेत येईल. |
| ४ | कंपोस्टींग / एस.टी.पी. / झीरो वेस्ट यत्रंणा कार्यान्वित असलेल्या निवासी मालमत्ता | कंपोस्टींग यंत्रणा, एस.टी.पी. प्लांट, तसेच झिरो वेस्ट संकल्पना राबविणाऱ्या इमारतींमधील निवासी मालमत्तांना | देय सामान्य कर रकमेत<br>१) ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा कार्यान्वीत असल्यास (ओला कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) - ५%<br>२) एसटीपी कार्यान्वीत असलेस - ३%<br>३) ऑनसाईट कंपोस्टींग यंत्रणा + एसटीपी कार्यान्वीत असलेस - ८%<br>४) झिरो वेस्ट संकल्पना राबविणेत येत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) - ८%<br>५) झिरो वेस्ट + एस.टी.पी. कार्यान्वीत असलेस (ओला व सुका कचरा पूर्णत: जिरविणाऱ्या) - १०% | निरंतर | १) परिपत्रक क्रमांक कर/मुख्य/९/कावि/०१/२०२२ दि.१५/०२/२०२२ मधील कार्यपध्दती व अटी/शर्ती कायम ठेवणेत येत आहे.<br>२) सदर सवलत साफ सफाई करा ऐवजी सामान्य कर रकमेत देणेत येत आहे. |
| ५ | आगाऊ मालमत्ताकर भरणारे मालमत्ताधारक | संपूर्ण मिळकतकराची रक्कम आगाऊ भरणा-यां करीता | देय सामान्य कर रकमेत<br>१) निवासी मालमत्ता<br>* सन २०२२-२३ करिता - १०%<br>* सन २०२३-२४ पासूनपुढे - ५%<br>२) बिगरनिवासी / मिश्र / औद्योगिक / मोकळया जमिनी इ. मालमत्ता - ५% | माहे एप्रिल ते जून अखेर (प्रत्येक वर्षी) | १) मालमत्ताधारकास चालू मागणीतील सामान्य कर रकमेवर सवलत देय राहिल. |

(नीलेश देशमुख)
सहा. आयुक्त, करसंकलन,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी १८.